ठाणे, सोमवार दि. ६ मे २०२४ वर्ष : १३, अंक : ०८, पाने : ४, किंमत : २ रुपये Maharashtra Samrat Maharashtra Samrat dainikmahasamrat@gmail.com Reg. No. THC/58/2024-2026

लोकसभेचा संग्राम

सम्राट अनेक परंतु बातम्यांचा एकच ! ®

# दैनिक महाराष्ट्र सम्राट

मुंबई, मुंबई उपनगर, ठाणे, नवी मुंबई, रायगड, पालघर आणि पुणे येथून प्रसिद्ध

संपादक : चंद्रकांत भोईटे


**तापमान**

कमाल ४१° से | किमान २८° से

**बाजार**

सोने ७२,६०० | चांदी ८४,०००

**डोकं खाजवा** –अशोक सुतार



तुला अतृप्त आत्मे पाहण्याचे खूळ लागलं आहे. ते पहायचे असतील तर निवडणुकीच्या प्रचारसभेत भेटतील.

# काही जणांना मस्ती आलीये, त्यांची मस्ती उतरवण्यासाठी आलोय

## ठाण्यातून उद्धव ठाकरेंचा मुख्यमंत्री शिंदेंवर पहिला हल्ला

शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे

**ऐरोली– राजन मला नाही तर मला खात्री आहे की, हिंदूहृदय सम्राटांना आणि धर्मवीरांना सुद्धा तुमचा अभिमान वाटत असेल. कारण शिवसेनेचे ठाणे आणि ठाण्याची शिवसेना आहे. काही जनांना मस्ती आली आहे. त्यांना वाटतं की, ठाणे आपली खासगी मालमत्ता आहे. ती मस्ती उतरवण्यासाठी मी आलो आहे. आज मला खात्री पटली की, मी एकटाच नाही तर तुम्ही सगळे जण आले आहात, असे ठाकरे गटाचे प्रमुख उद्धव ठाकरे म्हणाले. ठाणे लोकसभा मतदारसंघाचे महाविकास आघाडीचे उमेदवार राजन विचारे यांच्या प्रचारार्थ उद्धव ठाकरेंची सभा पार पडली. यावेळी ते बोलत होते. यावेळी ठाकरेंनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यासह मोदी–शाहांवर जोरदार हल्लाबोल केला.**

### काश्मीर आमच्या हिंदूस्थानचा अविभाज्य घटक आहे

आपल्या सीमा असुरक्षित आहेत. ३७० कलम काढलं, तुम्हाला मी जाहीर पाठिंबा दिला आहे. कारण काश्मीर आमच्या हिंदूस्थानचा अविभाज्य घटक आहे. पण गेल्या १० वर्षात काश्मीर असुरक्षित आहेत. तेव्हा काय केलं? सत्यपाल मलिकांनी तुमचं बिंग फोडलं. त्यांनी सांगितलं होतं रस्त्याने जाऊ देणं सैनिकांसाठी धोकादायक आहे. तुमच्या नादान पणा मुळे पुलवामा मध्ये सैनिकांचा जीव गेला. (पान २ वर)



### असली शिवसेनेला नकली शिवसेना म्हणतात ती माणसे बेअकली

जे माझ्या असली शिवसेनेला नकली शिवसेना म्हणतात ती माणसे बेअकली आहेत. मी महाराष्ट्रामध्ये सहन करणार नाही. आमची शिवसेना असली आहे. मोदींचे नाणे महाराष्टात चालत नाही. एक काळ होता हे आपल्याकडे हिणवत होते. तुमचे खासदार आमच्या मोदीजींमुळे निवडून आले म्हणत होते. गद्दारांनी त्यांच्या वडिलांचे फोटो लावा. गद्दारांजवळ हिंदूहृदय सम्राटांचा फोटो शोभत नाही. ही मर्दांची संघटना आहे, असंही उद्धव ठाकरेंनी स्पष्ट केले.

### माझी शिवसेना वडिलोपार्जित संपत्ती आहे

उद्धव ठाकरे म्हणाले, मला आठवते स्वातंत्र्याचा पूर्वीचा काळ होता. तेव्हा महाराष्ट्राचा एक सुपूत्र होता. त्यांनी सांगितले होते की, स्वराज्य माझा जन्म सिद्ध हक्क आहे आणि तो मी मिळवणारच. तेव्हा सरकारचे डोके ठिकाणावर आहे का? हा प्रश्न त्यांनी विचारला होता. आताच्या सरकारला डोकच नाही. ते खोकेबाज सरकार आहे. माझी शिवसेना वडिलोपार्जित संपत्ती आहे. मोदीजी तुम्ही पर्वाच्या मुलाखतीत म्हणाले की, उद्धवजींबद्दल मला प्रेम आहे. पण २०१४ मी तुमच्या नावाची शिफारस केली होती.

# हात भाजलेल्या लहानग्या रुद्रांशच्या मदतीला मुख्यमंत्री एकनाथ शिंदे गेले धावून

ठाणे :– शहरातील महायुतीचे उमेदवार नरेश म्हस्के यांची प्रचार रॅली आज किसन नगर परिसरात आयोजित करण्यात आली होती. यावेळी या रॅलीला सुरुवात झाली असतानाच घडलेल्या एका घटनेमुळे मुख्यमंत्र्यांच्या संवेदनशीलतेचा एक आगळा वेगळा अनुभव ठाणेकरांना पहायला मिळाला.

शिवसेना उमेदवार नरेश म्हस्के यांची प्रचार रॅली किसन नगर परिसरात पोहोचली,मात्र रॅली सुरू असतानाच अचानक मुख्यमंत्र्यांनी एक आई आपल्या जखमी मुलाचा हात हातात घेऊन रस्त्याने चाललेली दिसली. या आईच्या खांद्यावर एक मूल तर हातात दुसरे मूल होते. हातात असलेल्या मुलाचा हात गंभीररित्या भाजलेला असल्याने ती त्याला डॉक्टरकडे घेऊन जाण्याचा प्रयत्न करत होती. अशात मुख्यमंत्र्यांनी तिला पाहिले आणि त्या माऊलीची अडचण जाणून घेत ते रॅली सोडून तिच्या मदतीला धावून गेले.

त्यांनी तत्काळ त्या मुलाला आपल्यासोबत घेतले आणि त्याला जवळच्या मानवता हॉस्पिटलमध्ये ते घेऊन गेले. तिथे जाऊन त्यांनी डॉक्टराना त्यांच्या भाजलेल्या हातावर तत्काळ उपचार करायला सांगितले. रुद्रांश रोनीत चौधरी असे या नऊ वर्षाच्या मुलाचे नाव होते. घरात खेळत असताना अचानक हातावर तेल सांडल्याने त्याचा हात गंभीररीत्या भाजला होता. मुख्यमंत्र्यांनी त्याला रुग्णालयात आणल्यानंतर त्याच्यावर तत्काळ उपचार सुरू झाले. तो सुखरूप असल्याची खात्री झाल्यानंतरच मुख्यमंत्री महोदय पुन्हा एकदा प्रचार रॅलीमध्ये सहभागी होण्यासाठी निघाले. मात्र मुख्यमंत्र्यांनी दाखवलेल्या या तत्परतेमुळे त्यांची संवेदनशील मुख्यमंत्री ही ओळख ठाणेकर नागरिकांसमोर पुन्हा एकदा अधोरेखित झाली.

**शिवसेना उमेदवाराची प्रचार रॅली बाजूला ठेवत लहानग्यावर केले उपचार**



**थोडक्यात घडामोडी**

### पनवेल ते मडगाव, सावंतवाडी विशेष रेल्वेगाड्या धावणार

मुंबई : उन्हाळी हंगामात, सुट्टीच्या कालावधीत प्रवाशांची अतिरिक्त गर्दी विभाजित करण्यासाठी मध्य आणि कोकण रेल्वे मार्गावरून विशेष रेल्वेगाड्या चालवण्यात येणार आहेत. गाडी क्रमांक ०११५८ मडगाव ते पनवेल विशेष रेल्वेगाडी ६ मे रोजी सकाळी ६ वाजता सुटेल. ही गाडी त्याच दिवशी पनवेल येथे सायंकाळी ६.५० वाजता पोहोचेल. गाडी क्रमांक ०११५७ पनवेल – मडगाव विशेष रेल्वेगाडी पनवेल येथून ८ मे रोजी पहाटे ४ वाजता निघेल. ही गाडी त्याच दिवशी सायंकाळी ५ वाजता मडगाव येथे पोहोचेल. या गाडीला करमळी, थिवी, सावंतवाडी रोड, कुडाळ, सिंधुदुर्ग, (पान २ वर)

#### कोकण रेल्वे मार्गावर ब्लॉक

- विशेष गाड्यांमुळे कोकणात जाणाऱ्या प्रवाशांना काहीसा दिलासा मिळणार असला तरी प्रवासाचा कालावधी वाढणार आहे. कोकण रेल्वे मार्गावर देखभाल–दुरुस्तीची कामे करण्यासाठी, मंगळवारी ब्लॉक घेतला जाणार आहे. त्यामुळे अनेक रेल्वेगाड्यांच्या वेळावर परिणाम होणार आहे. ब्लॉकमुळे रेल्वेगाड्यांचा खोळंबा होण्याची शक्यता आहे.
- शिमगा म्हणजेच होळीच्या आधीपासून कोकणात जाणाऱ्या रेल्वे गाड्यांची गर्दी वाढू लागते. त्यामुळे या कालावधीत विशेष गाड्या सोडल्या जातात. त्यानुसार यंदाही मार्चपासूनच कोकण रेल्वे मार्गावर विशेष गाड्या सोडण्यात आल्या आहेत. या मार्गावर ६ जूनपर्यंत विशेष गाड्या धावतील.

# ओवळा माजिवाडा आणि मिरा भाईंदर विधानसभा मतदारसंघातून नरेश म्हस्के यांना मोठे मताधिक्य देणार

मिरा रोड, दि. ४ – ठाणे लोकसभा मतदारसंघात ६ विधानसभा क्षेत्र येत असून ओवळा माजिवडा आणि मिरा भाईंदर विधानसभा मतदारसंघांतून नरेश म्हस्के यांना सर्वाधिक मताधिक्य मिळवून देऊ, असा विश्वास आमदार प्रताप सरनाईक यांनी व्यक्त केला. ठाणे लोकसभा महायुतीचे शिवसेनेचे उमेदवार नरेश म्हस्के यांनी निवडणूक प्रचारानिमित्त ओवळा माजिवाडा आणि मिरा भाईंदर विधानसभा मतदारसंघातील भाजपा नेते, पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांच्या भेटीगाठी घेतल्या तेव्हा आमदार प्रताप सरनाईक यांनी कार्यकर्त्यांशी संवाद साधला. यावेळी आमदार गीता जैन, नरेंद्र मेहता, रवींद्र फाटक, विधानसभा निवडणूक प्रमुख रवी व्यास, भाजपा जिल्हाध्यक्ष किशोर शर्मा, १४५ विधानसभा प्रमुख रवी व्यास, युवा सेनेचे पूर्वेश सरनाईक आणि शिवसेना, भाजपा, राष्ट्रवादी काँग्रेस, मनसे, रिपाइं व मित्र पक्षांचे कार्यकर्ते यावेळी उपस्थित होते. गेल्या १० वर्षात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली देशाचा विकास झाला आहे. राज्यात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या नेतृत्वाखालील सरकारने राज्याला प्रगतीपथावर नेले आहे. (पान २ वर)



# बीकेसीत बनावट नोटा छापणारे अटकेत

मुंबई: लोकसभा निवडणुकीच्या काळात राज्यभरात बेनामी रोकड सापडण्याच्या घटना समोर येत असतानाच आता मुंबईतून एक धक्कादायक गोष्ट समोर आली आहे. येत्या २० मे रोजी मुंबई लोकसभा निवडणुकीसाठी मतदान होणार आहे. त्यामुळे सध्या मुंबईत सर्वच राजकीय पक्षांकडून जोरदार प्रचार सुरु आहे. ही सगळी धामधुम सुरु असताना मुंबई पोलिसांनी मोठी कारवाई केली आहे.

मुंबई पोलिसांनी शनिवारी रात्री बीकेसी परिसरातील बनावट नोटा तयार करणाऱ्या कारखान्यावर धाड टाकली. वांद्रे–कुर्ला संकुल येथील भारत नगर परिसरातील या कारखान्यात बनावट नोटा तयार केल्या जात होत्या. या कारखान्यात ५,१०,१००,५०० रुपयांच्या बनावट नोटा तयार केल्या जात होत्या. पोलिसांनी याठिकाणी धाड टाकून बनावट नोटा आणि त्यासाठी लागणाऱ्या कागदाचा साठा जप्त केला. याप्रकरणी पोलिसांनी नौशाद शाह आणि अली सय्यद या दोघांना अटक केली आहे. न्यायालयाने आरोपींना पाच दिवसांची पोलीस कोठडी सुनावली आहे. याप्रकरणी बीकेसी पोलीस अधिक तपास करत आहेत. पोलिसांकडून या दोन्ही आरोपींची कसून चौकशी सुरु आहे. या बनावट नोटा तयार झाल्यानंतर कुठे वितरीत केल्या जात होत्या, या सगळ्यामागे कोणाचा हात आहे, याचा शोध पोलिसांकडून घेतला जात आहे.



### दादर, सायनमधून रोकड जप्त

काही दिवसांपूर्वीच मुंबई उपनगरमधील भांडूप परिसरात पोलिसांनी साडेतीन कोटींची रोकड असलेली एक गाडी पकडली होती. मात्र,निवडणूक आयोगाच्या अधिकाऱ्यांनी चौकशी केल्यानंतर ही एटीएम व्हॅन असल्याचे समोर आले होते. या गाडीच्या चालकाकडे पुरेशी कागदपत्रे नसल्यामुळे पोलिसांना संशय आला होता. त्यामुळे ही एटीएम व्हॅन पोलिसांनी ताब्यात घेतली होती. मात्र, चौकशीनंतर ही व्हॅन सोडून देण्यात आली होती. तसेच सायन परिसरातही पोलिसांनी कारवाई करत एका कारमधून १ कोटी ८७ लाख ८० हजार रुपये जप्त केले होते. आयकर खात्याला याबाबत कळवण्यात आले होते. याशिवाय, दादरच्या शिंदे वाडी परिसरातून लाखो रुपयांची रोकड जप्त करण्यात आली होती.

# खारेगाव, कळवा भागात वाहतुक बदल



ठाणे : मुंबई नाशिक महामार्गाजवळील खारेगाव भागात भुयारी गटार योजनेअंतर्गत महापालिकेच्या माध्यमातून विविध कामे केली जात आहेत. या कामांसाठी ठाणे वाहतूक पोलिसांनी मुंबई नाशिक महामार्गावरील खारेगाव आणि साकेत पूल परिसरात मोठे वाहतूक बदल केले आहे. ३१ मे पर्यंत हे वाहतूक बदल कायम असतील.

खारेगाव भागात ठाणे महापालिकेच्या वतीने भुयारी गटार योजना टप्पा दोन अंतर्गत विविध कामे हाती घेण्यात आली आहेत. या कामांमुळे खारेगाव येथून मुंबई नाशिक महामार्गाला जोडणाऱ्या मार्गावर प्रवेशबंदी करण्यात आली असून मोठे वाहतूक बदल या भागात करण्यात आले आहेत. मुंबई नाशिक महामार्गावरून खारेगाव वळण रस्त्यावरून खारेगावच्या दिशेने वाहतूक करण्यास बंदी आहे. येथील वाहने गॅमन रोड, पारसिकनगर मार्गे किंवा नवीन कळवा पूलावरून वाहतूक करतील.

खारेगाव येथील वळण रस्त्यावरून ठाण्याच्या दिशेने वाहतूक करणाऱ्या वाहनांना वळण रस्त्याजवळ प्रवेशबंदी आहे. येथील वाहने ६० फूट मार्ग, दलवाडी, जुना पुणे–मुंबई मार्ग, कळवा नाका मार्गे वाहतूक करतील. हे वाहतूक बदल ३१ मे पर्यंत कायम असतील.

### मुंबईलगतच्या शहरांमधील एन्ट्रीवर नाकाबंदी

निवडणूक काळात पैशांच्या अवैध वाहतुकीवर निवडणूक आयोगाकडून नेमण्यात आलेली भरारी पथकं लक्ष ठेवून आहे. निवडणूक काळात प्रामुख्याने रोकड, दारू, अमली पदार्थ, मौल्यवान वस्तूंची मोठ्या प्रमाणात अवैध वाहतूक होत असते. त्यासाठी मुंबई शहर, उपनगर तसेच मुंबई लगतच्या शहरांच्या वेशीवर नाकाबंदी करण्यात आली असून गाड्यांची तपासणी सुरु आहे. मुंबईतील सहा लोकसभा मतदारसंघांमध्ये २० मे रोजी मतदान होणार आहे. या काळात मतदारांना पैशांचे वाटप होत आहे का, याकडे निवडणूक आयोग आणि पोलीस डोळ्यात तेल घालून लक्ष देत आहेत.

# निवडणूक खर्च निरीक्षक यांनी उमेदवारांच्या दैनंदिन खर्चाचा हिशोब ३ वेळा तपासावा

ठाणे – २५ ठाणे लोकसभा मतदारसंघातील सार्वत्रिक निवडणूक २०२४ मतदारसंघातील उमेदवारांचा खर्च भारत निवडणूक आयोगाच्या निवडणूक खर्च संनियत्रण नियमावलीतील भाग इ १ व भारत निवडणूक आयोगाच्या दि.१८ फेब्रुवारी २०१९ नुसार खर्च निरीक्षकांनी आपला दैनंदिन खर्चाचा हिशोब ३ वेळा तपासावयाचा आहे.

#### या तपासणीच्या तारखा खालीलप्रमाणे आहेत

- **तपासणीचे ठिकाण :–** सहाय्यक खर्च निरीक्षक यांचे कार्यालय, करमणूक कर शाखा, ४ था मजला, जिल्हाधिकारी कार्यालय, ठाणे.
- **खर्च तपासणीच्या तारखा:–** १) दि.०९ मे २०२४, २) दि.१३ मे २०२४ व ३) दि.१७ मे २०२४.
- **तपासणीची वेळ :–** सकाळी १०.०० वाजेपासून ते सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत.

सर्व प्रकारच्या नोंदवहया जसे की दैनंदिन खर्च नोंदवही, रोख नोंदवही, बँक नोंदवही, संबंधित प्रमाणके/देयके (खर्चाच्या पावत्या), बँक पासबुक व इतर सर्व मूळ कागदपत्रांसह वरील नमूद ठिकाणी व दिनांकास विहीत वेळेत उमेदवार अथवा त्यांच्या प्रतिनिधींनी उपस्थित राहण्याबाबत जाहीर आवाहन करण्यात येत आहे. वरीलप्रमाणे नमूद दिनांकास उपस्थित राहण्याबाबत उमेदवारांना ई–मेलव्दारेही लेखी सूचना देण्यात आल्या आहेत. तसेच या वेळापत्रकात काही अपरिहार्य कारणांमुळे बदल झाल्यास तसे दूरध्वनी/ई–मेलने कळविण्यात येईल, असे २५– ठाणे लोकसभा मतदारसंघ निवडणूक निर्णय अधिकारी मनिषा जायभाये–धुळे यांनी कळविले आहे.

## मुंबईलगतच्या 'या' शहरातील घरांसाठी म्हाडाने बदलला नियम

# आता लागणार फक्त दोन कागदपत्र

**मुंबई – विरार–बोळिंजमध्ये तयार असलेल्या घरांच्या विक्रीसाठी महाराष्ट्र गृहनिर्माण क्षेत्र विकास प्राधिकरण (म्हाडा)ने नियमांत पहिल्यांदा बदल केले आहेत. आता कोणताही अर्जदार फक्त आधार कार्ड आणि पॅन कार्ड दाखवून विरार बोळिंजमध्ये घर खरेदी करु शकतो. विरारमधील घरांसाठी पहिल्यांदाच म्हाडाने नियमांत बदल केले आहेत. अनेक प्रयत्न करुनही या भागातील घरे विक्रीला जात नसल्याने म्हाडाने हा निर्णय घेतल्याचे बोलले जात आहे.**

म्हाडाचे घर खरेदी करण्यासाठी अनेक कागदपत्रे जमा करावी लागतात. यात पॅन कार्ड, आधार कार्डसोबतच डोमिसाइल सर्टिफिकेट, उत्पन्नाचा दाखला, शपथपत्र, आरक्षणाचा लाभ घेण्यासाठी जात प्रमाणपत्र अशी सगळी कागदपत्रे जमा करावी लागतात. मात्र, विरारच्या घरासाठी म्हाडाने आता फक्त दोनच कागदपत्रे जमा करण्यास परवानगी दिली आहे. घरांची विक्री व्हावी या उद्देशाने नियमांत थोडी शिथिलता देण्यात आली आहे. विरार परिसरात म्हाडाचे जवळपास ५ हजार घरे आहेत. म्हाडा कोकण बोर्डाने या ५ हजार घरांसाठी अनेकदा लॉटरी काढली. लॉटरी निघाल्यानंतरही म्हाडा या घरांची विक्री करण्यात अयशस्वी झाले आहे.



- **विरारमधील म्हाडाच्या घरांसाठी म्हाडाने आणखी एक योजना**
- **नागरिकांना घर घेणे होणार सोप्पं**

विरारमधील घरांसाठी म्हाडाने प्रथम येणाऱ्यास प्राधान्य, ही योजनादेखील सुरू केली होती. मात्र ही योजनादेखील चालली नाही. विरारमधील बोळिंजच्या प्रोजेक्टमध्ये वन आणि टुबीएचके फ्लॅट आहेत. वन बीएचके फ्लॅटची किंमत जवळपास २३ लाख रुपये आणि टु बीएचके फ्लॅटची किंमत जवळपास ४४ लाख रुपये आहे. म्हाडाच्या एका वरिष्ठ अधिकाऱ्याने दिलेल्या माहितीनुसार, पॅन कार्ड आणि आधार कार्ड ही कागदपत्रे दाखवून अर्जदार अर्ज सादर करु शकता. पैसे जमा झाल्यानंतर दोन आठवड्यातच अर्जदाराला घराची चावी सोपवण्यात येईल. विरारचे घर खरेदी करण्यासाठी अर्जदाराला म्हाडाच्या वेबसाइटवर अर्ज सादर करु शकता.

संपूर्ण राज्यात म्हाडाचे जवळपास ११ हजार घरे आहेत ज्यांची विक्री अद्याप झालेली नाहीये. घरांची विक्री न झाल्यामुळं म्हाडाचे कित्येक करोड रुपये अडकले आहेत. गेल्या काही महिन्यांपासून म्हाडा हे (पान २ वर)

# संपादकीय...



संपादक–चंद्रकांत भोईटे

## सुशीलकुमार शिंदेंची भीती

सोलापूर लोकसभा लोकसभा मतदारसंघात काँग्रेसचा प्रचार सुरू झाला आहे. निवडणुकीत कोळी समाजाने काँग्रेसला दिलेल्या पाठिंब्यानंतर विजापूर रस्त्यावरील माशाळ वस्तीत समाजाचा मेळावा पार पडला. त्यावेळी माजी मुख्यमंत्री सुशीलकुमार शिंदे यांनी एक भीती पंतप्रधान नरेंद्र मोदी व भाजपाबद्दल व्यक्त केली आहे. शिंदे यांनी म्हटले आहे की, मोदी यांची वाटचाल थेट हुकूमशाहीकडे होत असून ते पुन्हा तिसऱ्यांदा पंतप्रधान झाल्यास हुकूमशाहीमुळे कोणालाही त्यांच्या विरोधात बोलता येणार नाही. जो बोलेल, त्याला अटक होईल. मी तर मंत्री होतो. त्यामुळे प्रथम मलाच तुरुंगात जावे लागेल, अशी भीती काँग्रेसचे ज्येष्ठ नेते सुशीलकुमार शिंदे यांनी व्यक्त केली आहे. सुशील कुमार शिंदे यांच्यासारख्या ज्येष्ठ नेत्यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याबद्दल भीती व्यक्त केल्यामुळे विरोधकांमध्ये भाजप व नरेंद्र मोदी यांच्याबाबत किती भीती आहे हे दिसून येते.

सुशील कुमार शिंदे यांना भाजप व नरेंद्र मोदी यांच्याविषयी वाटणारी भीती काही चुकीची नाही. कारण गेल्या काही वर्षांत विरोधकांवर केंद्र सरकारने केलेल्या राष्ट्रीय तपास यंत्रणेच्या कारवायामुळे देशातील विरोधकांमध्ये भीती निर्माण झाली आहे. त्यामुळे असे वाटते की, केंद्र सरकार लोकशाहीकडे न जाता हुकूमशाहीकडे वाटचाल करीत आहे. तसेच दुसरे कारण म्हणजे कोणीतरी केंद्रातील नेत्याने संशय घेतल्यावरून राष्ट्रीय तपास यंत्रणा विरोधकांना ताब्यात घेऊन त्यांना तुरुंगात टाकत आहे. दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांनाही अशाच प्रकारे तुरुंगात टाकण्यात आले आहे. त्यामुळे विरोधकांमध्ये ही भीती निर्माण झाली आहे की, पंतप्रधान नरेंद्र मोदी पुन्हा केंद्रात सत्तेवर आल्यानंतर देशात हुकूमशाही सुरू होईल. एका ज्येष्ठ नेत्याने हुकूमशाहीबद्दल बोलणे हे अधिक गंभीर व विचार करायला लावणारे आहे. सुशील कुमार शिंदे हे विरोधकांबद्दल बोलताना काही नितीनियम बाळगूनच बोलतात. त्यांच्या भीतीला केंद्र सरकार खतपाणी घालत असल्यासारखे वाटते.

सोलापूर लोकसभा निवडणुकीत कोळी समाजाने काँग्रेसला दिलेल्या पाठिंब्यानंतर विजापूर रस्त्यावरील माशाळ वस्तीत समाजाचा मेळावा पार पडला. कोळी समाजाने सुशीलकुमार शिंदे व काँग्रेसला सोलापूर लोकसभा मतदारसंघात पाठिंबा दिला आहे. परंतु सुशील कुमार शिंदे यांना पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि भाजपाच्या गैरवर्तनाची भीती वाटत असल्याचे दिसते. ते सुशील कुमार शिंदे यांनी या सभेत बोलून दाखवले एवढेच ! सुशीलकुमार शिंदे सभेत बोलताना म्हणाले की, दहा वर्षांपूर्वी नरेंद्र मोदी यांच्यावर जनतेने मोठा विश्वास ठेवून आणि भूलथापांना बळी पडून त्यांच्या हाती सत्ता सोपविली होती. परंतु मोदी यांना आता सत्तेची चटक लागली आहे. यंदाची लोकसभा निवडणूक अधिक महत्वाची असून हुकूमशाही विरुद्ध लोकशाहीची ही लढाई असल्याचे त्यांनी सांगितले. तसेच देशामध्ये विद्यमान केंद्र सरकारबद्दल उलटसुलट चर्चा झाल्यामुळे पंतप्रधान नरेंद्र मोदींना भर सभेत सांगावे लागते की, आम्ही संविधान रद्द करणार नाही. भारतीय संविधानाप्रमाणेच देश चालेल, याचे स्पष्टीकरण पंतप्रधान मोदी सर्वत्र देत आहेत. तसेच यावेळी देशातील विरोधकांना केंद्र सरकारच्या कारवाईमुळे झालेला त्रास काही भरून निघणार नाही. कारण सर्वच विरोधक भ्रष्टाचारी नाहीत हेही समजून घेण्यासारखे आहे. फक्त कुणीतरी शंका घेत आहे म्हणून एखाद्या विरोधी पक्षाच्या नेत्याला तुरुंगातत टाकणे ही रणनीती भाजपकडून सुरू झाली आहे. परंतु ही केंद्र सरकारची मनमानी व एकाधिकारशाही असल्याचे दिसून येते. तसेच पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी जनतेसमोर बोलताना म्हटले होते की, आम्ही कोणतेही आरक्षण रद्द करणार नाही. कारण पंतप्रधान मोदींच्या मनात भीती आहे. कारण भाजपा व केंद्र सरकार अल्पसंख्यांक समाजाचे आरक्षण रद्द करण्याविषयी नेहमी बोलत आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी व त्यांच्या सहकाऱ्यांच्या काही वक्तव्यामुळे व आरक्षण विरोधी भूमिकेमुळे जनतेमध्ये नाराजी पसरलेली आहे. त्यामुळे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना असे वाटते की, जनता आपल्याला २०२४ च्या लोकसभा निवडणुकीत निवडून देईल की नाही ? याच शंकेमुळे पंतपेअधान मोदींना आरक्षणाबाबत स्पष्टीकरण द्यावे लागत आहे आणि आरक्षण आम्ही कोणत्याही परिस्थितीत रद्द करणार नाही असे स्पष्टीकरण ते देत असल्याचे दिसते.

सुशीलकुमार शिंदे यांनी वंचित बहुजन आघाडीचे नेते प्रकाश आंबेडकर यांच्यावर सादर सभेत टीकास्त्र सोडले. लोकसभा निवडणुकीनंतर संभाव्य चौकशी टाळण्यासाठी सुशीलकुमार शिंदे व प्रणिती शिंदे भाजपमध्ये प्रवेश करतील, असे भाकीत आंबेडकर यांनी सोलापुरात केले होते. त्यास प्रत्युत्तर देताना, प्रकाश आंबेडकरांचा बोलावता धनी कोण आहे, हे नव्याने सांगण्याची गरज नाही, अशी प्रतिक्रिया व्यक्त केली. आपण मुलगी प्रणितीसह भाजपमध्ये जाणार असल्याच्या अफवा वारंवार पसरविल्या जातात. आमचा जन्म काँग्रेससाठी झाला आहे. आम्हाला काँग्रेसने घडविले आहे. आमच्या रक्तातच काँग्रेस आहे, असा दावा त्यांनी केला.

सुशील कुमार शिंदे यांनी प्रकाश आंबेडकर यांच्या एका टीकेला उत्तर देताना पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यावरही वाकबाण सोडलेले दिसतात. कारण प्रकाश आंबेडकर यांनी असे भाकीत केले होते की, सुशील कुमार शिंदे आणि त्यांची मुलगी प्रणिती शिंदे या निवडणुकीनंतर भाजपमध्ये प्रवेश करतील. परंतु तसे काही होणार नसल्याचे सुशील कुमार शिंदे यांनी म्हटले आहे. जरी पंतप्रधान नरेंद्र मोदी व भाजपा विरोधकांवर कारवाई करत आहेत. परंतु सुशील कुमार शिंदे यांनी काँग्रेस पक्ष दीर्घकाळ सोडलेला नाही. त्यांची सुरुवातही काँग्रेसमधून झाली होती आणि ते सध्या काँग्रेसमध्येच आहेत. या किरकोळ कारवायामुळे सुशील कुमार शिंदे विचलित होणार नसल्याचे दिसते. त्यामुळे सुशील कुमार शिंदे यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी व केंद्र सरकारबद्दल भीती व्यक्त केलेले दिसते.


## जाहिरातीसाठी एकमेव दै. 'महाराष्ट्र सम्राट'

- ☆ मिळकट नोटीस
- ☆ हस्तांतर करार नोटीस
- ☆ नोंदणी न्यास नोटीस
- ☆ निविदा जाहिरातीसाठी
- ☆ तहसिल जाहीरनामा
- ☆ कामगार न्यायालय नोटीस
- दिलेल्या जाहिरात त्वरित प्रसिद्ध करणेसाठी एकमेव दैनिक महाराष्ट्र सम्राट
- शुभेच्छा / वाढदिवस जाहिरातीसाठी महाराष्ट्रातील प्रभावी दैनिकांपैकी एक म्हणजे महाराष्ट्र सम्राट

संपर्क : दै. महाराष्ट्र सम्राट, विक्रीकर कार्यालय शेजारी, गेट नं. ४, कलेक्टर कंपाऊंड, कोर्टनाका, ठाणे (प.) ४००६०१
☎ 022 - 25379944 , +91 - 9167957771


* पीआरबी कायद्यानुसार सर्व वाद आणि दावे ठाणे न्यायालयीनकक्षेच्या आधीन राहिल. (या वर्तमानपत्रात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या / लेख / जाहिराती यांची जबाबदारी संबंधित वार्ताहर, लेखक आणि जाहिरात प्रतिनिधी यांच्यात राहिल.)

महाराष्ट्र सम्राट
*DISCLAIMER: Readers are requested to verify and make appropriate enquires to satisfy themselves about the veracity of an advertisement before responding to any published in this newspaper. The publisher & the owner of this newspaper, does not vouch for the authenticity of any advertiser's products and/ or services. In no event can the Owner, Publisher, Printer, Editor, Director's, Employees of this newspaper/ company be held responsible/liable in any manner whatsoever for any claims and/or damages for advertisments in the newspaper.

# ठाण्यात शिवसेनेला उमेदवारी, भाजपचा सावध पवित्रा....



**ठाणे लोकसभा मतदार संघ मुख्यमंत्री एकनाथ शिंदे गटासाठी सोडून भाजपने स्मार्ट खेळी केली आहे. कल्याणसह ठाणे लोकसभेवरील हक्का सोडून आपण मित्र पक्षांना सन्मानाने वागवतो तसेच सतत घराणेशाहीला आता थारा मिळणार नाही, असा ठळक संदेश देत महायुतीचा धर्म पाळा आणि प्रधानमंत्री नरेंद्र मोदींसाठी दिलेला उमेदवार निवडून आणा असेच जणूकाही ठणकावून सांगितले आहे. भाजपच्या या खेळीमुळे पक्षांतर्गत तसेच मित्र पक्षांमध्ये असलेल्या नाराजीचा फुगा फोडत ठाणे जिल्ह्यावर भक्कमपणे नियंत्रण ठेवू शकेल असा हक्काचा माणूस हवा होता. एकनाथ शिंदेंबाबत भाजप नेतृत्वाला सध्या भरवसा वाटत असावा, असे सध्यातरी दिसते.**

## शिंदेंची मजबूत पकड

मुख्यमंत्रीपदाची सूत्रे हाती घेतल्यानंतर एकनाथ शिंदे यांनी मुंबईसह नवी मुंबई, कल्याण डोंबिवली, ठाणे, मीरा भाईंदर या जिल्ह्यातील महानगरपालिकांवर प्रशासकीय यंत्रणेच्या माध्यमातून आपली पकड मजबूत करीत आर्थिक नियंत्रण आपल्याकडे ठेवले आहे. शिंदेचा महापालिकांवरील वरचष्मा भाजपसह इतर मित्र पक्षांसाठी काहीशा डोकेदुखी ठरणारा असला तरी सध्या त्याकडे दुर्लक्ष करून अधिकाधिक जागा पदरात पाडून घेण्याकडे भाजपचा कल राहील. शिवाय पुढील विधानसबा निवडणुका होईपर्यंत एकनाथ शिंदेच मुख्यमंत्री राहतील अशी अपेक्षा आहे. त्यामुळे घाईघाईने कोणताही निर्णय घेण्यापेक्षा परिस्थितीनुरुप पावले टाकण्यावर भाजपचा भर राहील, असेच काहीसे चित्र दिसते..

## मनसे फॅक्टर फायदेशीर

ठाणे जिल्ह्यात एकनाथ शिंदे यांच्या सोबतीला भाजपसह उपमुख्यमंत्री अजित पवार यांचा राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष, राज ठाकरे यांची मनसे शिवाय इतरही मित्र पक्ष असणार आहेत. शिंदे यांचीही मदार आपल्या निष्ठावंतांसह भाजप, मनसे आदी मित्रपक्षांवरही असणार आहे. भाजपसाठी ४०० पार हे उद्दीष्ठ असल्यामुळे ते नक्कीच मदत करतील, अशी आशा आहे. तर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांच्या वाढत्या मैत्रीचाही उमेदवार नरेश म्हस्के यांना फायदा होण्याची शक्यता आहे. या निवडणुकीच्या निमित्ताने मनसेलाही विधानसभेआधी आपली ताकत आजमवण्याची संधी मिळणार आहे.



## शिंदे गटाला उमेदवारी का ?

ठाणे जिल्ह्यात सहा विधानसभा मतदार संघ आहेत. त्यामध्ये बेलापूरः मंदा म्हात्रे - भाजप, ऐरोलीः गणेश नाईक भाजप, ठाणेः संजय केळकर-भाजप, पाचपाखाडीः एकनाथ शिंदे (शिवसेना), ओवळा माजिवाडा: प्रताप सरनाईक - शिवसेना, मीरा भाईंदर : गीता जैन - भाजप यांचा समावेश आहे.

ठाण्यातील सहा विधानसभा मतदारसंघांमधील ४ मतदार संघ हे भाजपच्या ताब्यात आहेत. तर २ मतदार संघ एकनाथ शिंदें यांच्या शिवसेनेकडे आहेत. मात्र असे असले तरी सगळ्या मतदार संघांवर म्हणजेच संपूर्ण ठाणे जिल्ह्यावर प्रभाव पाडू शकेल असा नेता सध्यातरी भाजपकडे नाही. त्यामुळे मतदार संघ अधिक ताब्यात असूनही मुख्यमंत्री पद असणाऱ्या एकनाथ शिंदेंना ठाणे लोकसभा मतदार संघ देण्याबाबत भाजपच्या केंद्र तसेच राज्यातील नेत्यांनी शांतपणे विचार केला असणार हे नक्की.

भाजप नेतृत्व घराणेशाहीविरोधात असल्याचे नेहमीच सांगते. सातत्याने एकच उमेदवार दिल्यास कार्यकर्ते तसेच मतदारांना नाविण्याचा अभाव जाणवतो. भाजपने संजीव नाईक यांना उमेदवारी दिल्यास नवी मुंबईत आणि नवी मुंबईबाहेर भाजपच्या उमेदवाराला कितीसा प्रतिसाद मिळे, याबाबत नक्कीच विचार केला असणार. त्यामुळे संजीव नाईक यांना उमेदवारी देण्याऐवजी एकनाथ शिंदे गटाला जागा देत काहीशी सुरक्षित पावले टाकण्याचे धोरण भाजपने स्वीकारल्याचे दिसते.

उद्धव ठाकरेंशी फारकत घेऊन शिवसेना ताब्यात घेतल्यानंतरची एकनाथ शिंदेंची ही पहिलीच मोठी निवडणूक असणार आहे. त्यामुळे शिवसेना ताब्यात घेतल्यानंतर शिवसैनिक आणि शिवसेनेला मानणाऱ्या मतदारांचा त्यांना कसा कौल मिळतो,यावर एकनाथ शिंदेंची राजकीय वाटचाल अवलंबून असणार आहे. समजा उद्या लोकसभेच्या निवडणुकीत एकनाथ शिंदेंच्या विरोधात जर निकाल गेला तर भाजपच्या अधिक जवळ जाण्याव्यतिरिक्त त्यांच्याकडे सध्यातरी ठोस असा पर्यंत दिसत नाही. तसेच ठाणे काबीज केले तरी राज्यभरातील डोलारा एकट्याने सांभाळण्याची मोठी कसरत करावी लागेल आणि ते त्रासाचे ठरू शकेल. आगामी विधानसभा निवडणुकीची गणिते नक्कीच वेगळी असणार. अशावेळी कितीही बळकटी आली तरी एकट्याने विरोधकांशी लढण्यापेक्षा समुहात राहून आपले अस्तित्व टिकवण्यावर महायुतीमधील सर्व पक्ष अधिक जोर देतील,असे वाटते. त्यामुळे निकाल काहीही लागो भाजपच्या सहाय्याने आपली राजकीय वाटचाल मजबूत करणे शिंदेंसाठी आवश्यक ठरते. तर एकनाथ शिंदेंच्या माध्यमातून ठाण्यासारख्या मोठ्या जिल्ह्यावर नियंत्रण ठेवणे भाजपलाही काहीसे सोपे जाईल.




## भावना महत्वाची ठरणार का ?

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी मूळ पक्ष फोडून त्या पक्षांवर आपला हक्का सांगितला आहे. त्याचा परिणाम पक्षाचे मूळ नेतृत्व आणि पक्षाला मानणारे निष्ठावंत दुखावले गेल्याचे बोलले जाते. त्यामध्ये बऱ्याच अंशी तथ्य असले तरी जसजसा काळ पुढे सरकतो, तसतशी दुःखाची तीव्रताही कमी होत जाते. जखमा भरू लागतात आणि रागाची धारही बोथट होते. त्यानंतर भानावर आलेले मन भावनेऐवजी वास्तवतेचा अधिक विचार करून त्यादिशेने झुकण्याची शक्यता अधिक असते. त्यामुळे आपले हित कशात आहे, समाज विकासाची कामे होत आहेत का, याचा विचार नक्कीच केला जाईल. सध्या महागाई, बेरोजगारी आदी सर्वसामान्यांना भेडसावणाऱ्या समस्यांबाबत केंद्रातील आणि राज्यातील सरकारांकडे बोट दाखवले जाईल. त्यामुळे या समस्यांवर जो मात करील, जो तोडगा काढील, तो लोकांची सहानुभूती मिळवेल. त्यामुळे कुणी पक्ष फोडला, कुणासोबत कोण गेला हे मुद्दे मग लक्षात राहीले तरी कालांतराने गौण व्हायला लागतात. मात्र असे असले तरी गोळा बेरजेचे राजकारण करताना मग मतदारांच्या भावनांनाच हात घालून मते खेचण्याचे प्रयत्न होताना नक्कीच दिसतील. त्यामुळे पक्ष फोडल्याचा आरोप होणारे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे राजकीय भवितव्य काय असणार याचीच चर्चा सर्वाधिक रंगलेली दिसून येते आणि या चर्चेच्या गुन्हाळात भाजप व उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा काहीसा विसर पडल्याचे दिसून येते. ही बाब भाजपच्या पथ्यावर पडणारी असून शिंदे आणि पवार यांच्या वाट्याला जनता काय वाढणार याकडेच लोकांचे अधिक लक्ष लागलेले आहे. त्यानुसार भाजप आपली पुढील रणनिती ठरवील असे मानायला हरकत नाही.

## काही जणांना मस्ती आलीये, त्यांची मस्ती उतरवण्यासाठी आलोय

**(पान १ वरून)** सत्यपाल मलिक यांनी तुमचे ढोंग समोर आणले आहे. यावर का बोलत नाही ? मोदी कधीही महागाई , बेकारी , नोकर्या , महिला सुरक्षेवर बोलत नाहीत. फक्त धर्मावर बोलत आहेत, असेही ठाकरेंनी सांगितले.

## पनवेल ते मडगाव, सावंतवाडी विशेष रेल्वेगाड्या धावणार

**(पान १ वरून)** कणकवली, वैभववाडी रोड, राजापूर रोड, विलावडे, अडावली, रत्नागिरी, संगमेश्वर रोड, सावर्डे, चिपळूण, खेड, वीर, माणगाव आणि रोहा येथे थांबा आहे. या रेल्वेगाडीला २० एलएचबी डबे असून त्यातील १० शयनयान, ८ सामान्य आणि दोन एसएलआर डबे असतील.

गाडी क्रमांक ०११५९ पनवेल - सावंतवाडी रोड विशेष रेल्वेगाडी ६ मे रोजी रात्री ८ वाजता पनवेल येथून निघेल. दुसऱ्या दिवशी ती गाडी सावंतवाडी रोडला सकाळी ६ वाजता पोहोचेल. गाडी क्रमांक ०११६० सावंतवाडी रोड - पनवेल विशेष गाडी ७ मे रोजी दुपारी ४ वाजता सावंतवाडी रोडवरून निघेल. दुसऱ्या दिवशी ही गाडी रात्री ३ वाजता पनवेलला पोहोचेल. या रेल्वेगाडीला रोहा, माणगाव, वीर, खेड, चिपळूण, सावर्डे, संगमेश्वर रोड, रत्नागिरी, अडवली, विलावडे, राजापूर रोड, वैभववाडी रोड, कणकवली, सिंधुदुर्ग आणि कुडाळ येथे थांबा असेल. या गाडीला २० एलएचबी डबे असून यामधील १० शयनयान, ८ सामान्य आणि दोन एसएलआर डबे असतील, अशी माहिती कोकण रेल्वे प्रशासनाकडून देण्यात आली.

## ओवळा माजिवाडा आणि मिरा भाईंदर विधानसभा मतदारसंघातून नरेश म्हस्के यांना मोठे मताधिक्य देणार

**(पान १ वरून)** केंद्र आणि राज्य शासनाच्या माध्यमातून ठाणे आणि मिरा भाईंदर शहरातील अनेक प्रकल्प मार्गी लागत आहेत. नरेश म्हस्के हे ठाण्याचे माजी महापौर आहेत. त्यांना प्रशासनातील दांडगा अनुभव आहे. असा उमेदवार संसदेत खासदार म्हणून गेला तर या दोन्ही शहरांचा विकास होईल. त्यामुळे या दोन्ही मतदारसंघातून त्यांना मोठे मताधिक्य देण्यासाठी मेहनत घेऊया, असे आवाहन आमदार प्रताप सरनाईक यांनी केले. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे हात बळकट करण्यासाठी तसेच खासदार म्हणून नरेश म्हस्के यांना मोठ्या मतांच्या फरकाने निवडून आणण्यासाठी भाजप कार्यकर्ते अहोरात्र मेहनत घेत असल्याचे, आमदार गीता जैन यांनी सांगितले.

## आता लागणार फक्त दोन कागदपत्र

**(पान १ वरून)** अडकलेले पैसे परत मिळवण्यासाठी वेगवेगळ्या योजनांवर काम करत आहेत. त्यासाठी खासगी संस्थेंच्या मदतीने घरांची विक्री करण्याची योजना तयार केली आहे. या योजनेअंतर्गत घराच्या एकूण किंमतीतील २५ टक्के रक्कम जमा केल्यानंतर नागरिकांना घरांचा ताबा मिळणार आहे. त्यांनंतर उर्वरित रक्कम १० वर्षांत द्यावी लागणार आहे. त्यासाठी ८.५० टक्के व्याज द्यावे लागणार आहे. त्यासोबतच १०० टक्के रक्कम जमा करणाऱ्या नागरिकांना १५ टक्के सूट देण्याच्या योजनेवरही काम सुरू आहे.

# पत्रकारितेत राजकारणा शिवाय दुसरे विषयही महत्वाचे – विजय कुवळेकर

मुंबई –राजकारणाशिवाय दुसरे इतर विषय ही महत्वाचे आहेत. प्राधान्य कशाला द्यावे याचे भान अपवाद वगळता काही मालक संपादक पत्रकार विसरत चालले आहेत. अनेक पत्रकारांना भूगोल, इतिहास, समाजशास्त्र इतर विषयाचे आकलन नाही. यासाठी मार्गदर्शन शिबिर आयोजित करून देण्याची गरज आहे. असे मत ज्येष्ठ संपादक विजय कुवळेकर यांनी महाराष्ट्र संपादक परिषदेने आयोजित केलेल्या पत्रकारिता गौरव आदर्श साहित्य पत्रकारिता सन्मान पुरस्कार व विशेष पुरस्कार २०२४ सोहळ्यावेळी व्यक्त केले.

शनिवार ४ मे रोजी मुंबईतील दादर- माटुंगा कल्चरल सेंटर, जे. के. सावंत मार्ग, माटुंगा पश्चिम येथे सायंकाळी सदर समारंभ आयोजित करण्यात आला होता. महाराष्ट्र संपादक परिषदेचे संस्थापक स्व. यशवंत पाध्ये यांच्या स्मरणार्थ आयोजित करण्यात आलेल्या या समारंभाला अध्यक्ष म्हणून दैनिक देशोन्नतीचे संपादक प्रकाश पोहरे, प्रमुख अतिथी म्हणून जेष्ठ पत्रकार श्री यमाजी मालकर, जेष्ठ संपादक श्री विजय कुवळेकर, जेष्ठ नाटककार श्री सुरेश खरे आणि जेष्ठ साहित्यिक श्री रवींद्र आवटी उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सुसंवादिनी शिबानी जोशी यांनी केले. या कार्यक्रमाची सुरुवात बाळशास्त्री जांभेकर व स्व. यशवंत पाध्ये यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून व दीपप्रज्वलनाने झाली. तर कार्यक्रमाचे प्रास्ताविक परिषदेचे कार्याध्यक्ष श्री प्रकाश कुलथे यांनी केले.

२०२४ चे पत्रकारिता साहित्य गौरव पुरस्कार झी २४ तास वृत्तवाहिनीचे संपादक श्री कमलेश सुतार, दैनिक ठाणे वैभवचे संपादक श्री मिलिंद बल्लाळ, दैनिक संध्याकाळच्या संपादिका रोहिणी खाडिलकर, आयबीएन लोकमतचे प्रतिनिधी श्री महेश तिवारी, एबीपी माझा वृत्तवाहिनीच्या पत्रकार ज्ञानदा कदम, पुण्य नगरी - ठाणे चे निवासी संपादक श्री हेमंत जुवेकर, महाराष्ट्र टाइम्स चे प्रतिनिधी श्री वैभव वझे, सीएनएन न्यूज १८ च्या ब्युरो चीफ विनया देशपांडे (पंडित), मराठवाडा साहित्य संमेलन २०२३ चे माजी अध्यक्ष श्री जगदीश कदम, दै. सकाळचे प्रतिनिधी श्री महेश माळवे, साप्ताहिक लोकवृत्तान्त चे संपादक श्री एकनाथ बिरवटकर यांना देण्यात आले.

पत्रकारिता साहित्य गौरव विशेष पुरस्कार जेष्ठ साहित्यिक रवींद्र आवटी, दैनिक नांदेड एकजूटच्या जेष्ठ संपादिका अनुराधा विष्णूपुरीकर, सहकार आणि शैक्षणिक क्षेत्रातील आनंदराव (दादा) माईंगडे, लोककला शाहीर रुपचंद चव्हाण यांना देण्यात आले.




महाराष्ट्र संपादक परिषद ही संस्था कोणत्याही संघटनेशी समांतर किंवा स्पर्धात्मक कार्य न करता पत्रकारितेच्या उद्दिष्टांसाठी कार्यरत राहणारी संस्था आहे. ही संस्था म्हणजे संपादक-मालक प्रामुख्याने दैनिकांचे व त्यांनी नामनिर्देशित केलेले प्रतिनिधी यांची संघटना आहे. ही संस्था ध्येयासक्त, पारदर्शी आणि विश्वासार्ह आदर्श पत्रकारितेसाठी वचनबद्ध असेलेली संस्था आहे. ही संस्था मराठी भाषा, संस्कृती व अस्मितेशी वचनबद्ध असून, या संस्थेने वाचन संस्कृतीचे संवर्धन व ग्रंथालय चळवळीमध्ये सहभाग घेतला होता. विविध प्रसार माध्यमांशी अनुबंध निर्माण करून त्यांच्या सहयोगातून लोकप्रबोधन, लोकशिक्षण आणि लोकजागृती यांसाठी सहभाग घेणे, पत्रकारांसाठी कल्याणकारी उपक्रम राबविणे, पत्रकारिता आणि साहित्य यांचा अनुबंध राखणे आणि नैसर्गिक आणि आपदग्रस्त पत्रकारांसाठी साहाय्य करणे हे महाराष्ट्र संपादक परिषदेचे प्रमुख उद्दिष्ट राहिलेले आहे. तसेच या संस्थेतर्फे दरवर्षी आदर्श पत्रकारिता गौरव पुरस्कार योजनेमधून राज्यस्तरीय मानवंत व गुणवंत पत्रकारांचा सन्मान केला जातो. मुंबई आऊटलूक मीडिया हाऊस चे मुख्य संपादक व महाराष्ट्र संपादक परिषद चे अध्यक्ष श्री संजय मलमे यांनी आभार मानले. वरील कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी परिषदेचे सचिव श्री एकनाथ बिरवाटकर, उपाध्यक्ष श्री गजानन चव्हाण व श्री सुधीर जाधव, कोषाध्यक्ष श्री अनंत पाध्ये व सर्व सदस्यांनी परिश्रम घेतले.

## भारतीय आर्थिक/सांख्यिकी सेवा परीक्षा

■ जागा : ४८ जागा
■ IES भारतीय आर्थिक सेवा परीक्षा
■ ISS भारतीय सांख्यिकी सेवा परीक्षा
■ शैक्षणिक पात्रता:
■ IES : पदव्युत्तर पदवी. (Economics/Applied Economics/ Business Economics/Econometrics)
ISS: nXdr (Statistics/Mathematical Statistics/Applied Statistics) किंवा पदव्युत्तर पदवी (Statistics/ Mathematical Statistics/Applied Statistics)
वयाची अट: ०१ ऑगस्ट २०२४ रोजी २१ ते ३० वर्षे, SC/ST: ०५ वर्षे सूट, OBC: ०३ वर्षे सूट
■ वय गणकयंत्र: वय मोजा
■ नोकरी ठिकाण: संपूर्ण भारत.
■ Fee: General/OBC: 200/- SC/ ST/PWD/महिला:फी नाही
■ अर्ज करण्याची शेवटची तारीख: ३० एप्रिल २०२४
■ परीक्षा: २१ जून २०२४
■ अधिकृत वेबसाईट: https://upsc.gov.in/

## मुंबई नेव्हल डॉकयार्ड

■ पदाचे नाव: अप्रेंटिस (प्रशिक्षणार्थी)
१ इलेक्ट्रिशियन
२ इलेक्ट्रोप्लेटर
३ फिटर
४ फाउंड्रीमन
५ मेकॅनिक
६ इन्स्ट्रुमेंट मेकॅनिक
७ मशीनिस्ट
८ चचढच्
९ पेंटर
१० पॅटर्न मेकर
११ पाईप फिटर
१२ इलेक्ट्रॉनिक्स मेकॅनिक
१३ मेकॅनिक Reff.
१४ शीट मेटल वर्कर ०३
१५ शिपराईट (Wood) १८
१६ टेलर (G) ०३
१७ वेल्डर (G E) २०
१८ मेसन (BC) ०८
१९ I CTSM² ०३
२० शिपराईट (Steel) १६
२१ रिगर १२
२२ फोर्जर हीट ट्रीटर ०१
■ शैक्षणिक पात्रता:
रिगर: ०८वी उत्तीर्ण
फोर्जर हीट ट्रीटर: १०वी उत्तीर्ण
उर्वरित पदे: संबंधित ट्रेड मध्ये ITI (NCVT/SCVT)
■ शारीरिक पात्रता: उंची छाती वजन १५० सेमी फूगवून ०५ सेमी जास्त ४५
वयाची अट: किमान १४ वर्षे SC/ST: ०५ वर्षे सूट
■ अर्ज करण्याची शेवटची तारीख: १० मे २०२४
■ परीक्षा: मे/जून २०२४
■ अधिकृत वेबसाईट: https://www.indiannavy.nic.in/

## केंद्रीय सशस्त्र पोलीस दल

■ परीक्षेचे नाव: संयुक्त केंद्रीय सशस्त्र पोलीस दल (असिस्टंट कमांडंट) परीक्षा २०२४
■ जागा : ५०६
■ पदाचे नाव: असिस्टंट कमांडंट
1 BSF
2 CRPF
3 CISF
4 ITBP
5 SSB
■ शैक्षणिक पात्रता: कोणत्याही शाखेतील पदवी.
■ शारीरिक पात्रता:
पुरुष/महिला उंची छाती वजन
पुरुष १६५ से.मी. ८१-८६ से.मी. ५० ज्ञस
महिला १५७ से.मी. - ४६ ज्ञस
■ वयाची अट: ०१ ऑगस्ट २०२४ रोजी २० ते २५ वर्षे SC/ST: ०५ वर्षे सूट, OBC: ०३ वर्षे सूट
■ वय गणकयंत्र: वय मोजा
■ नोकरी ठिकाण: संपूर्ण भारत.
■ Fee: General/OBC: 200/- SC/ ST/महिला: फी नाही
■ अर्ज करण्याची शेवटची तारीख: १४ मे २०२४
■ लेखी परीक्षा: ०४ ऑगस्ट २०२४
■ अधिकृत वेबसाईट: https://www.mha.gov.in/en/about-us/central-armed-police-forces

## स्टाफ सिलेक्शन कमिशन

■ परीक्षेचे नाव: संयुक्त उच्च माध्यमिक (१०+२) स्तर (CHSL) परीक्षा २०२४
■ पदाचे नाव तपशील:
१ कनिष्ठ विभाग लिपिक / कनिष्ठ सचिवालय सहाय्यक
२ डेटा एंट्री ऑपरेटर
३ डेटा एंट्री ऑपरेटर
■ शैक्षणिक पात्रता: १२वी उत्तीर्ण.
■ वयाची अट: ०१ ऑगस्ट २०२४ रोजी १८ ते २७ वर्षे SC/ST: ०५ वर्षे सूट, OBC: ०३ वर्षे सूट
■ वय गणकयंत्र: वय मोजा
■ नोकरी ठिकाण: संपूर्ण भारत.
■ Fee: General/OBC: 100/- SC/ST/PWD/ ExSM²/महिला: फी नाही
■ अर्ज करण्याची शेवटची तारीख: ०७ मे २०२४
■ परीक्षा:Tier-I: जून-जुलै २०२४
Tier-II: नंतर सूचित केले जाईल.
■ अधिकृत वेबसाईट: https://ssc.nic.in/

## भारतीय सैन्य

■ कोर्सचे नाव: 140th टेक्निकल पदवीधर कोर्स जानेवारी २०२५
■ पदाचे नाव: TGC
■ शैक्षणिक पात्रता: संबंधित विषयात इंजिनिअरिंग पदवी किंवा इंजिनिअरिंगच्या शेवटच्या वर्षातील उमेदवार.
■ वयाची अट: जन्म ०२ जानेवारी १९९८ ते ०१ जानेवारी २००५ दरम्यान.
■ नोकरी ठिकाण: संपूर्ण भारत
■ फी : फी नाही.
■ अर्ज करण्याची शेवटची तारीख: ०९ मे २०२४
■ अधिकृत संकेतस्थळ https://www.indianarmy.nic.in/

## आर्ममेंट रिसर्च डेव्हलपमेंट एस्टॅब्लिशमेंट

■ जागा : २०
■ ज्युनियर रिसर्च फेलो
■ रिसर्च असोसिएट
■ शैक्षणिक पात्रता:
पद क्र.१: प्रथम श्रेणी BE/B.Tech+NET/GATE किंवा प्रथम श्रेणी M.Sc+NET
पद क्र.२: (i) PhD (ii) ME/M.Tech (iii) ०३ वर्षे अनुभव
वयाची अट: २८ वर्षांपर्यंत SC/ST: ०५ वर्षे सूट, OBC: ०३ वर्षे सूट
■ वय गणकयंत्र: वय मोजा
■ नोकरी ठिकाण: पुणे
■ : फी नाही.
■ अर्ज पाठविण्याचा पत्ता: The Director, Armament Research Development Establishment (ARDE), Armament Post, Pashan, Pune- 411021
■ अर्ज पोहचण्याची शेवटची तारीख: ३१ मे २०२४
■ अधिकृत वेबसाईट: https://www.drdo.gov.in/drdo/labs-and-establishments/armament-research-development-establishment-arde

## दक्षिण पूर्व मध्य रेल्वे

■ Grand Total : २७०७ जागा (८६१+१११३+७३३)
■ P (SECR) अप्रेंटिस पदाच्या ८६१ जागांसाठी भरती (नागपूर)
■ P (SECR) अप्रेंटिस पदाच्या १११३ जागांसाठी भरती (रायपूर)
■ P (SECR) अप्रेंटिस पदाच्या ७३३ जागांसाठी भरती (बिलासपूर)
■ जाहिरात क्र.: P/NGP/SAS/२०२४/१६
■ आस्थापना क्र.: E०५२०२७०२६९५ E०५२०२७०२४९४
■ Total: ८६१ जागा
■ पदाचे नाव: अप्रेंटिस (प्रशिक्षणार्थी)
■ शैक्षणिक पात्रता: (i) ५०% गुणांसह १०वी उत्तीर्ण (ii) संबंधित ट्रेड मध्ये ITI
■ वयाची अट: १० एप्रिल २०२४ रोजी १५ ते २४ वर्षे SC/ST: ०५ वर्षे सूट, OBC: ०३ वर्षे सूट
■ वय गणकयंत्र: वय मोजा
■ नोकरी ठिकाण: नागपूर
■ फी : फी नाही.
■ अर्ज करण्याची शेवटची तारीख: ०९ मे २०२४
■ अधिकृत वेबसाईट: https://secr.indianrailways.gov.in/

## महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनी लि.

■ जागा : ५३४७
■ पदाचे नाव: विद्युत सहाय्यक
■ शैक्षणिक पात्रता: (i) १०+२ बंधातील माध्यमिक शालांत परीक्षा (१०वी) (ii) ITI (विजतंत्री/तारतंत्री (Electrician / Wireman) किंवा महाराष्ट्र राज्य व्यवसाय परीक्षा मंडळ यांनी प्रमाणित केलेले ०२ वर्षांचा पदविका (Electrician / Wireman) अभ्यासक्रम प्रमाणपत्र.
■ वयाची अट: २९ डिसेंबर २०२३ रोजी १८ ते २७ वर्षे मागासवर्गीय/आ.दु.घ.: ०५ वर्षे सूट
■ वय गणकयंत्र: वय मोजा
■ नोकरी ठिकाण: संपूर्ण महाराष्ट्र
■ फी : खुला प्रवर्ग: २५०/- मागासवर्गीय/आ.दु.घ./अनाथ: १२५/-
■ अर्ज करण्याची शेवटची तारीख: २० मे २०२४
■ अधिकृत वेबसाईट: https://www.mahadiscom.in/

## हिंदुस्थान उर्वरक आणि रसायन लिमिटेड

■ जागा : ८०
१ मॅनेजर / (L2)
२ इंजिनिअर/ (L-1)
३ ऑफिसर/ (L-1)
४ चीफ मॅनेजर/ (L-3)
५ असिस्टंट मॅनेजर/(L1) FTC
६ ऑफिसर/(L1) FTC
■ शैक्षणिक पात्रता:
पद क्र.१: (i) ६०% गुणांसह इंजिनिरिंग पदवी/B.Sc.(-gri)+ M.Sc./CA/CMA (ii) १२ वर्षे अनुभव
पद क्र.२: (i) ६०% गुणांसह इंजिनिरिंग पदवी (ii) ०२ वर्षे अनुभव
पद क्र.३: (i) ६०% गुणांसह इंजिनिरिंग पदवी/ MBA/CA/CMA (ii) ०२ वर्षे अनुभव
पद क्र.४: (i) CA/CMA/ PGDM²/ MBA (Finance) (ii) १९ वर्षे अनुभव
पद क्र.५: (i) ६०% गुणांसह पदवी/PG डिप्लोमा (Communication/ -dvertising Communication Management/Public Relations/ Mass Communication/ Journalism) किंवा MBA/MSW किंवा B.Sc. (Agri)+ M.Sc.(Agriculture) किंवा BSc.Agri/B.Tech+ MBA/PGDBM² (ii) ०७ वर्षे अनुभव
पद क्र.६: (i) LLB (ii) ०५ वर्षे अनुभव
■ वयाची अट: २० मे २०२४ रोजी, SC/ST: ०५ वर्षे सूट, OBC: ०३ वर्षे सूट
पद क्र.१: ४० वर्षांपर्यंत
पद क्र.२: ३० वर्षांपर्यंत
पद क्र.३: ३० वर्षांपर्यंत
पद क्र.४: ४७ वर्षांपर्यंत
पद क्र.५: ४५ वर्षांपर्यंत
पद क्र.६: ३५ वर्षांपर्यंत
■ वय गणकयंत्र: वय मोजा
■ नोकरी ठिकाण: संपूर्ण भारत
■फी : फी नाही.
■ अर्ज करण्याची शेवटची तारीख: २० मे २०२४
■ अधिकृत वेबसाईट: https://hurl.net.in/

# मैदा किंवा गव्हाच्या पिठाऐवजी फक्त बदामाचे पीठ वापरावे का?

पारंपरिक गव्हाच्या पिठाऐवजी ग्लूटेन मुक्त किंवा कमी कार्बोहायड्रेट पर्याय शोधणाऱ्यांमध्ये बदामाचे पीठ लोकप्रिय ठरत आहे. अनेक पाककृतींमध्ये हा एक उत्तम पर्याय ठरू शकतो, परंतु इतर पिठांऐवजी बदामाचे पीठ वापरण्यापूर्वी त्याचे गुणधर्म आणि मर्यादा समजून घेणे महत्त्वाचे आहे.

### बदामाचे पीठ कसे बनवले जाते?

बदामाचे पीठ - जे प्रथिने, निरोगी फॅट्स आणि फायबर यांसारख्या पोषक तत्वांनी समृद्ध आहे. हे बारीक चिरलेल्या बदामापासून बनवले जाते. त्याची खमंगता भाजलेल्या पदार्थांना अधिक चव देते, ज्यामुळे ते गोड आणि चवदार दोन्ही पाककृतींसाठी एक बहुमुखी पर्याय बनते. बदामाच्या पिठात व्हिटॅमिन ई, हेल्दी फॅट्स आणि मॅग्नेशियमबरोबर भरपूर फायबर असते, जे मेंदूच्या विकासाला मदत करते. हे हाडांसाठी चांगले आहे, प्रतिकारशक्ती मजबूत करते आणि ऊर्जा वाढवते, असे बाल पोषणतज्ज्ञ असलेल्या मोना नरुला यांनी एका इन्स्टाग्राम पोस्टमध्ये सांगितले.

बदामाच्या पिठाचा सर्वात लोकप्रिय फायदा म्हणजे त्यात कार्बोहायड्रेट कमी असतात (गव्हाच्या पिठाच्या तुलनेत). जे लोक कमी कार्बोहायड्रेट किंवा केटोजेनिक आहाराचे पालन करत आहेत, त्यांच्यासाठी हे अतिशय योग्य पर्याय ठरते. शिवाय, बदामाचे पीठ नैसर्गिकरित्या ग्लूटेन मुक्त आहे, ज्यामुळे ग्लूटेन संवेदनशीलता किंवा सेलिआक आजार असलेल्या लोकांसाठी हा एक चांगला पर्याय ठरतो, असे डॉ. संगीता तिवारी यांनी द इंडियन एक्स्प्रेसला माहिती देताना सांगितले. डॉ. तिवारी या दिल्लीतील न्यू फ्रेंड्स कॉलनीमधील आर्टेमिस लाइटच्या क्लिनिकल पोषणतज्ज्ञ आहेत.

### ब्रेड किंवा केकसारख्या बदामाचे पीठ वापरावे का?

डॉ. तिवारी यांच्या मते, ब्रेड किंवा केकसारख्या पाककृतींमध्ये फक्त बदामाचे पीठ आवश्यक रचना निर्माण करू शकत नाही. नारळाच्या पिठासारख्या इतर ग्लूटेन मुक्त पिठांबरोबर ते एकत्र केले जाऊ शकते, जेणेकरून त्याची रचना अधिक चांगली होईल.

### मैदा किंवा संपूर्ण गव्हाच्या पिठाऐवजी बदामाचे पीठ का वापरावे?

मैदा किंवा संपूर्ण गव्हाचे पीठ यांसारख्या इतर पिठांऐवजी बदामाचे पीठ वापरताना त्याचा पोत आणि आर्द्रता शोषणातील फरक विचारात घेणे महत्त्वाचे आहे. बदामाचे पीठ पारंपरिक पिठांपेक्षा जास्त दाट आणि ओलसर असते, जे भाजलेले खाद्यपदार्थ तयार करताना वापरल्यास त्याच्या चवीवर परिणाम करू शकते, असे तिवारी यांनी सांगितले.

### कुकीज, मफिन्स आणि पॅनकेक्ससाठी बदामाचे पीठ उत्तम पर्याय ठरू शकतो का?

कुकीज, मफिन्स आणि पॅनकेक्ससारख्या पाककृतींसाठी बदामाचे पीठ मैद्यासाठी एक पर्याय असू शकतो. तिवारी म्हणाले, त्यातील नैसर्गिक आर्द्रता भाजलेले पदार्थ ओलसर आणि कोमल ठेवण्यास मदत करतो, परिणामी एक योग्य पोत निर्माण होतो, असे तिवारी यांनी सांगितले

### मांस आणि भाज्यांसाठी आवरण म्हणून बदामाचे पीठ वापरावे का?

बदामाच्या पिठाचा वापर मांस आणि भाज्यांसाठी आवरण म्हणून देखील केला जाऊ शकतो. पदार्थ तळले किंवा बेक केल्यावर कुरकुरीत पोत देते आणि चवही वाढवते. हा ब्रेडक्रंब्ससाठी देखील आरोग्यदायी पर्याय आहे आणि पारंपरिक पाककृतींना स्वादिष्ट ट्विस्ट देतो, असेही तिवारी यांनी स्पष्ट केले.

### लक्षात ठेवण्याच्या गोष्टी

जरी ते बहुमुखी आहे, तरी बदामाचे पीठ दाण्यांची एलर्जी असलेल्या लोकांसाठी योग्य असू शकत नाही. अशा प्रकरणांमध्ये, त्याऐवजी नारळाचे पीठ किंवा ग्लूटेन मुक्त ओटसचे पीठ वापरता येईल, असे तिवारी यांनी सुचवल बदामाचे पीठ हे अनेक पाककृतींमध्ये इतर पिठांसाठी एक नैसर्गिक पर्याय असू शकते, परंतु त्याचे अद्वितीय गुणधर्म, तुमची आहारातील प्राधान्ये आणि इतर वैयक्तिक घटक समजून घेणे तुम्हाला अधिक माहितीपूर्ण निवड करण्यात मदत करू शकते.

### पद्धत

बदाम रात्रभर भिजत ठेवा
त्यांना चांगले वाळवा
त्वचा सोलून घ्या
५-७ मिनिटे चांगले भाजून घ्या
त्यांना थंड करून बारीक वाटून घ्या (जास्त दळणे टाळा)

### तर इतर पिठांऐवजी बदामाच्या पिठाचे सेवन करावे का?



# गुजरातचा पराभव करत आरसीबीचा मुंबईला मोठा धक्का

आरसीबीने घरच्या मैदानावर मोठा विजय मिळवत गुजरातचा ४ विकेट्सने पराभव केला. गुजरातला पराभूत केल्यानंतर आरसीबीने १०व्या क्रमांकावरून थेट सातव्या क्रमांकावर झेप घेतली आहे आणि प्लेऑफमध्ये पोहोचण्याच्या आशांना जिवंत ठेवले आहे. तर आरसीबीने हा सामना जिंकत मुंबईला धक्का दिला आहे, मुंबई इंडियन्सचा संघ आता गुणतालिकेत शेवटच्या स्थानी पोहोचला आहे. आरसीबीच्या अष्टपैलू कामगिरीच्या जोरावर फाफ डू प्लेसिसच्या नेतृत्त्वाखाली संघाने यंदाच्या मोसमातील सर्वात उत्कृष्ट कामगिरी केली आहे. विराट कोहली आणि फाफच्या फलंदाजीने संघाला एक जबरदस्त सुरूवात करून दिली. या दोघांनी आरसीबीसाठी पॉवरप्लेमध्ये ९२ धावांची सर्वात मोठी भागीदारी रचली. नाणेफेक जिंकत प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला आणि हा निर्णय संघाच्या पथ्यावर पडला. आरसीबीच्या गोलंदाजांनी शानदार गोलंदाजीचे प्रदर्शन दाखवत गुजरातच्या फलंदाजांना फार काळ टिकू दिले नाही.



गुजरातने दिलेल्या १४८ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना विराट आणि फाफ डू प्लेसिसने सर्वाधिक ९२ धावांची भागीदारी रचली. फाफने आरसीबीसाठी दुसरे सर्वात जलद अर्धशतक झळकावले. फाफने २३ चेंडूत ३ षटकार आणि १० चौकारांच्या मदतीने ६४ धावा केल्या. तर विराटने २७ चेंडूत ४ षटकार आणि २ चौकारांच्या मदतीने ४२ धावा केल्या. यानंतर विल जॅक्स, रजत पाटीदार, ग्लेन मॅक्सवेल आणि कॅमरून ग्रीन यांनी झटपट विकेट गमावल्याने आरसीबीला लागोपाठ ४ धक्के बसले. या सामन्यात दिनेश कार्तिक पुन्हा एकदा आरसीबीसाठी तारणहार ठरला. दिनेश कार्तिक आणि स्वप्नील सिंग यांनी मैदानावर टिकून राहत संघाला विजय मिळवून दिला. कार्तिकने १२ चेंडूत ३ चौकारांसह २१ धावा केल्या, तर स्वप्निलने ९ चेंडूत १ षटकार आणि २ चौकारांसह १५ धावा केल्या.

तत्पूर्वी गुजरातने प्रथम फलंदाजी करताना सर्वबाद १४७ धावा केल्या. आरसीबीच्या गोलंदाजीपुढे गुजरातच्या फलंदाजांनी तर पार गुडघे टेकले. एकाही फलंदाजाला फार काळ मैदानावर टिकू दिले नाही. गुजरातच्या एकाही फलंदाजाने ४० धावांचा आकडा गाठला नाही. यासह गुजरातने ३ बाद २३ धावांसह आयपीएल २०२४ मधील पॉवरप्लेमधील सर्वात कमी धावसंख्या केली आहे. जीटीचे पहिले तीन फलंदाज साहा, गिल आणि साई अनुक्रमे १,२ आणि ६ धावा करून बाद झाले. त्यानंतर आलेल्या शाहरूख खान (३७) आणि डेव्हिड मिलरने (३०) संघाचा डाव सावरला, पण मोठी धावसंख्या गाठू शकले नाही. त्यानंतर राहुल तेवतियाने २१ चेंडूत १ षटकार आणि ५ चौकारांसह ३५ धावा केल्या. तर राशीद खान(१८), विजय शंकर (१०) हे झटपट बाद झाले. तर अखेरच्या षटकात मानव सुतार, मोहित शर्मा (धावबाद) आणि नूर अहमद हे शेवटच्या षटकातील पहिल्या तीन चेंडूवर बाद झाले. मोहित शर्मा धावबाद झाल्याने विजयकुमार वैशाखची हॅटट्रिक मात्र चुकली.

आरसीबीकडून सिराज, यश दयाल आणि विजयकुमार वैशाख यांनी प्रत्येकी २ विकेट मिळवले. तर कर्ण शर्माला एक विकेट मिळवण्यात यश आले.

## विजयासह पॉईंट्स टेबलमध्ये घेतली मोठी झेप

# भिवंडीत कोळी बांधवांचा मेळावा संपन्न




भिवंडी : भिवंडी लोकसभा मतदारसंघाचे महायुतीचे उमेदवार केंद्रीय राज्यमंत्री कपिल पाटील यांच्या प्रचारानिमित्त कोळी महासंघाच्या वतीने कोळी महासंघाचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा आमदार रमेशदादा पाटील यांच्या उपस्थितीत कल्याण येथे कोळी बांधवांचा मेळावा संपन्न झाला.

याप्रसंगी कोळी महासंघाचे उपनेते देवानंद भोईर, रवींद्र भंडारी, सुभाष भाबडे, सुभाष कोळी, ज्ञानेश्वर भोईर, भाजपा शहराध्यक्ष वरूण पाटील, प्रशांत पाटील, मनसे शहराध्यक्ष दिनेश भोये, मधुकर भोये, रमेश शिरसाठ, भरत भोपी, राजेश जाधव, राजू कोट, वर्षा कोनकर यांच्यासह महायुतीतील घटक पक्षांचे प्रमुख पदाधिकारी आणि कोळी बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी बोलताना आमदार रमेश पाटील यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे नेतृत्वामध्ये आपला देश सुजलाम सुफलाम झाला असून गेल्या दहा वर्षात मोदी सरकारने सर्वसामान्य जनतेकरीता प्रचंड कामे केली व अनेक महत्त्वपूर्ण निर्णय घेतले असल्याचे सांगितले. तसेच मत्स्यसंपदा योजनेच्या माध्यमातून मच्छीमार बांधवांना मोठ्या प्रमाणात लाभ झाला असल्याचे सांगितले. त्याचप्रमाणे आपल्या देशाला महासत्ता बनविण्याकरता पंतप्रधान नरेंद्र मोदींचे हात बळकट करणे गरजेचे असल्याने कपिल पाटील यांना प्रचंड मताने विजयी करण्याचे आवाहन केले.

# कल्याण पूर्व मतदारसंघात वासुदेवांमार्फत मतदान जनजागृती



कल्याण : लोकसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ अंतर्गत २४ कल्याण लोकसभा या १४२ कल्याण पूर्व विघानसभा मतदार संघात मतदार जनजागृतीसाठी विविध जनजागृतीपर स्वीप कार्यक्रमाची अंमलबजावणी ठिकठिकाणी होत आहे. याच अनुषंगाने १४२ कल्याण पूर्वचे सहा. निवडणूक निर्णय अधिकारी गोपीनाथ ठोंबरे आणि अति.सहा. निवडणूक निर्णय अधिकारी डॉ. स्वाती घोंगडे यांचे मार्गदर्शनाखाली आज स्वीप पथकातील (मतदार जनजागृतीपथक ) महापालिकेचे शिक्षणाधिकारी तथा नोडल अधिकारी विजय सरकटे (स्वीप) यांच्या अधिपत्याखाली १४२ कल्याण पूर्व विधानसभा मतदार संघातील डावलपाडा, वसार, मानेरे, आशेळे, खडेगोळवली या गावात जाऊन वासूदेवांमार्फत पथनाटय सादर करुन मतदारांना मतदान करणेबाबत आवाहन करण्यात आले. सदर ठिकाणी मोठया प्रमाणात नागरिकांनी आम्ही मतदान करणार आणि तुम्ही पण मतदान करा अशा घोषणा दिल्या.

या ठिकाणी लाऊडस्पिकरव्दारे मतदान जनजागृतीपर गीत वाजवून मतदान करणेबाबतचा संदेश गावातील नागरिकांना देण्यात आला.

यासमयी स्वीप टिमचे कर्मचारी स्टुडंट ऑयकान प्रणव देसाई, समाधान मोरे, विलास नंदनवार, सर्जेश वेलेकर, अजय खंडाळे, मिडीया टिमचे उमेश यमगर, निलेश चव्हाण उपस्थित होते.

# ठाणे जिल्ह्यातील निवडणूक शांततेत पार पाडण्यासाठी गांभीर्यपूर्वक काम करावे : केंद्रीय निवडणूक निरीक्षक

ठाणे (गणेश भोईटे) : देशात लोकसभा निवडणुकांचा उत्सव सुरू असून पाचव्या टप्यातील मतदान प्रक्रिया येत्या २० मे २०२४ रोजी होत आहेत. ठाणे जिल्ह्यातील २३-भिवंडी, २४- कल्याण आणि २५ - ठाणे या लोकसभा मतदारसंघातील निवडणुकांसाठी सर्व यंत्रणांनी समन्वयाने काम करायचे असून ही निवडणूक प्रक्रिया ही शांततेत व नि:पक्षपातीपणे पार पाडण्यासाठी सर्वांनी आपल्यावर सोपविण्यात आलेले काम हे गांभीर्यपूर्वक करावे, असे निर्देश भिवंडी, कल्याण, ठाणे या मतदारसंघात दाखल झालेल्या सर्व निवडणूक निरीक्षकांनी तीनही लोकसभा क्षेत्रातील निवडणूक निर्णय अधिकारी, नोडल अधिकारी तसेच पोलीस यंत्रणांना आज झालेल्या बैठकीत दिले.

जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी श्री. अशोक शिनगारे यांच्या प्रमुख उपस्थितीत नियोजन भवनातील समिती सभागृहात आयोजित बैठकीत निवडणूक प्रक्रियेच्या अनुषंगाने आज निवडणूक निरीक्षकांनी आढावा घेतला.




या बैठकीस २५ ठाणे लोकसभा मतदारसंघासाठीचे केंद्रीय निवडणूक निरीक्षक (सर्वसाधारण) जे.श्यामला राव (आयएएस), खर्च निरीक्षक चंद्र प्रकाश मीना (आयआरएस), २४ कल्याण लोकसभा मतदारसंघासाठीचे निवडणूक निरीक्षक (सर्वसाधारण) मनोज जैन (आयएएस), खर्च निरीक्षक नकुल अग्रवाल (आयआरएस) आणि पोलीस निरीक्षक कु. इलाक्किया करुणागरन (आयपीएस) , आणि २३ भिवंडी लोकसभा मतदारसंघासाठीचे निवडणूक निरीक्षक (सर्वसाधारण) राजनवीर सिंग कपूर (आयएएस), खर्च निरीक्षक चित्तरंजन धंगडा माझी (आयआरएस) आणि पोलीस निरीक्षक के. जयरामन (आयपीएस) उपस्थित होते. तसेच तीनही लोकसभा मतदारसंघाचे निवडणूक निर्णय अधिकारी व सर्व नोडल अधिकारी उपस्थित होते.

यावेळी जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी शिनगारे यांनी संपूर्ण ठाणे जिल्ह्यातील तीनही लोकसभा मतदारसंघांची माहिती उपस्थित निरीक्षकांना दिली. तसेच भिवंडी, कल्याण, ठाणे या मतदारसंघातील निवडणुकांसाठी राबविण्यात येणारी मतदान प्रक्रिया व त्यासाठी लागणारी यंत्रणा यांची माहिती सर्व निरीक्षकांना दिली.

नि:पक्षपातीपणे, शांततेत व भारत निवडणूक आयोगाने आखून दिलेल्या मार्गदर्शक सूचनांनुसार आदर्श आचारसंहितेचे पालन करुन यशस्वीपणे पार पाडण्यासाठी आपापसात उत्तम समन्वय साधावा. त्यासाठी मतदान प्रक्रियेत सहभागी असलेल्या सर्वांनी भारत निवडणूक आयोगाने दिलेल्या सूचनांचा बारकाईने अभ्यास करावा, असे निर्देश ठाणे लोकसभा मतदारसंघाचे केंद्रीय निवडणूक निरीक्षक (सर्वसाधारण) राव यांनी यावेळी दिले.

रेल्वेच्या माध्यमातून देखील मोठ्या प्रमाणावर बेकायदेशीर कॅशची ने-आण होण्याची शक्यता नाकारता येत नाही, असे नमूद करीत ठाणे रेल्वे स्टेशनवर पोलीस विभागाच्या माध्यमातून आरपीएफची नेमणूक करण्याच्या सूचना खर्च निरीक्षक नकुल अग्रवाल यांनी या बैठकीत दिल्या.

मतदानाच्या दिवशी मतदान केंद्रावरील मतदान केंद्राध्यक्ष यांना त्या दिवशी सकाळपासून कोणकोणत्या गोष्टी करावयाच्या आहेत उदा. मतदान सुरू झाल्यापासून ते संपेपर्यंत भरण्यात येणारे फॉर्म, त्यासाठीची प्रक्रिया, मॉक पोलिंग आदी कामाची चेकलिस्ट करुन ती सर्व मतदान केंद्रावर देता येईल का ते पाहावे. जेणेकरुन मतदान केंद्रावरील कर्मचाऱ्यांना काम करणे सोपे जाईल. तसेच मनुष्यबळ व साहित्याची वाहतूक करण्यासाठी सूक्ष्म आराखडा तयार करण्याच्या सूचनाही सर्वसाधारण निरीक्षक श्री. जैन यांनी यावेळी सर्व सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी यांना दिल्या.

मतदान प्रक्रिया हे टीमवर्क आहे. शेवटच्या टप्प्यातील ठाणे जिल्ह्यातील मतदान प्रक्रिया ही यशस्वीपणे पार पाडण्यासाठी श्री.के.जयरामन, कु.करुणागरन, श्री.मीना यांनी उपस्थित सर्वांना शुभेच्छा दिल्या.

बैठकीच्या शेवटी एकत्रित मीडिया कक्ष व माध्यम प्रमाणीकरण व सनियंत्रण समितीचे नोडल अधिकारी मनोज सुमन शिवाजी सानप यांनी उपस्थित केंद्रीय निवडणूक निरीक्षक आणि उपस्थित नोडल अधिकाऱ्यांचे आभार मानले.

### महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबई नवी मुंबईतर्फे

# वीर वाजेकर महाविद्यालयास उत्कृष्ट कॉलेज पुरस्कार




नवी मुंबई : महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघ प्रदेशाध्यक्ष वसंत मुंडे राज्य संघटक संजयजी भोकरे, राज्य सरचिटणीस डॉ. विश्वासराव आरोटे, प्रसिद्धी प्रमुख नवनाथ जाधव. यांच्या संकल्पनेतून पुरस्कार गुण गौरव सोहळा नवी मुंबई येथे आयोजित केला होता. वरील कार्यक्रम दरम्यान राज्य सर चिटणीस डॉ. विश्वासराव आरोटे हे उपस्थित होते. त्यांच्या हस्ते मान्यवरांचा सन्मान पुणेरी पगडी, शाल, फुलगुच्छ, सन्मानपत्र, डायरी, कॅलेंडर, पेन, किचन, कॅप याचे वितरण करण्यात आले. आयोजन दशरथ चव्हाण नवी मुंबई जिल्हा अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक मंडळाचे सूत्रप्रमुख कैलास पाटील, तुकाराम गावंड, संतोष जोशी, कामेश्वर म्हात्रे, हरीचंद्र म्हात्रे, सुरेश म्हात्रे, सचिन पाटील, जितेंद्र म्हात्रे, अरुण म्हात्रे, विजय गावंड, दीपक सोनवणे, तसेच महाराष्ट्र गुन्हे तपासचे मुख्य संपादक सुभाष जाधव उपस्थित होते.

रयत शिक्षण संस्थेचे वीर वाजेकर महाविद्यालय फुंडे म. रा. प. संघ मुंबई यांनी उत्कृष्ट कॉलेज पुरस्कार प्राप्त झाला आहे. हा पुरस्कार प्राचार्य डॉ पवार साहेब यांना देण्यात आला आहे. प्राचार्य डॉ. पवार यांना आदर्श प्राचार्य पुरस्कार देण्यात आला. रसायशास्त्र विभागातील प्रा. डॉ. मऱ्याप्पा चुडाप्पा सोनवले यांना आदर्श शिक्षक पुरस्कार प्रधान करण्यात आला. या कार्यक्रमासाठी प्रा. दिलीप केंगार, प्रा. डॉ. संदीप घोडके, प्रा. राम गोसावी, प्रा. डॉ. राहुल पाटील , प्रा डॉ अमोद ठक्कर, प्रा. भोये, प्रा. भूषण ठाकूर, प्रा. प्रांजळ भोईर, प्रा. यशवंत गायकवाड, प्रा. डॉ गुरुमित वादवा, प्रा. संतोष देसाई, प्रा. डॉ. स्मिता तांदळे, प्रा. डॉ. श्रेया पाटील, प्रा. डॉ. रत्नमाला जावळे, प्रा. डॉ. झेलम झेंडे, प्रा. दीक्षित माहत्रे. प्रा डॉ. सुजाता पाटील यानी सूत्रसंचालन केले. प्रा. गजानन चव्हाण यांनी आभार प्रदर्शन केले.

# नाराज राजेंद्र गावित प्रचारापासून लांबच, वसईत हेमंत सावरा यांचा प्रचार सुरू

वसई : पालघर लोकसभा मतदारसंघातून उमेदवारी डावललेले खासदार राजेंद्र गावित कमालिचे नाराज असून त्यांनी प्रचारापासून दूर राहणेच पसंद केले आहे. त्यामुळे रविवारी वसई विरारमध्ये गावित यांच्याशिवाय महायुतीचे उमेदावर हेमंत सावरा यांनी प्रचार सुरू केला आहे. गावित प्रचारात नसले तरी शिवसेना गटाचे पदाधिकारी मात्र प्रचारात उतरले आहेत.

रविवार हा प्रचाराचा महत्वाचा दिवस असल्याने सर्वच पक्षांनी आज भरगच्च प्रचाराचा कार्यक्रम आखला आहे. रविवारी महायुतीचे उमेदवार हेमंत सावरा यांचा प्रचारदौरा वसई विरार शहरात सुरू झाला आहे. विरारच्या जीवदानी मंदिरात आशिर्वाद घेऊन सावरा यांना प्रचाराला प्रारंभ केला. यावेळी पालकमंत्री रवींद्र चव्हाण उपस्थित होते. पालघर लोकसभा मतदारसंघातून ऐनवेळी उमेदवारी नाकारल्याने विद्यमान खासदार राजेंद्र गावित यांची नाराजी अद्याप कायम आहे. राजेंद्र गावित यांनी सावरा यांच्या प्रचाराकडे पाठ फिरवली आहे. संध्याकाळी वसईत महायुतीची जाहीर सभा असून त्याला देखील ते उपस्थित राहणार नाहीत. 'माझ्यावर अन्याय झालेला आहे. त्यामुळे सध्या तरी मी प्रचारात नाही असे गावित यांनी सांगितले. मतदारसंघात काही दिवसांपूर्वी मी माझ्यासाठी मते मागत होतो आणि आता माझ्याऐवजी दुसऱ्याला मते द्या असे सांगणे मला जड जात आहे', असे गावित यांनी सांगितले. संध्याकाळी मला दुसर्या कामाला जायचे असल्याने मी प्रचार सभेला उपस्थित राहणार नाही, असेही ते म्हणाले.

# राज्याचे भविष्य पालघरमध्येच : 'जेएनपीए'च्या अध्यक्षांचा विश्वास

पालघर : जवाहरलाल नेहरू बंदर प्राधिकरणाचे (जेएनपीए) सध्या सुरू असणारा विस्तारीकरण प्रकल्प एप्रिल २०२५ मध्ये पूर्णपणे कार्यरत होणार आहे. वाढवण बंदराची उभारणी झाल्यास पुढील १० वर्षांत १० लाख प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष रोजगार निर्मिती होणार असून महाराष्ट्राचे भविष्य पालघरमध्ये राहणार असल्याचे प्रतिपादन जवाहरलाल नेहरू बंदर प्राधिकरणाचे अध्यक्ष उन्मेश वाघ यांनी केले.

जवाहरलाल नेहरू बंदर प्राधिकरणाचा विस्तारीकरण प्रकल्प अंतिम टप्प्यात असून बंदरातील पद्धतींमधील कार्यक्षमता वाढवली तरी या बंदरात सध्या हाताळणी होणाऱ्या सुमारे साडेसहा दशलक्ष कंटेनरचे प्रमाण १० दशलक्षांपर्यंत पोहोचू शकेल अशी शक्यता आहे. अशा स्थितीत देशातील निर्यात व आयात क्षेत्रात होणारी वाढ व होणारा औद्योगिक विकास पाहता भविष्याच्या दृष्टिकोनातून वाढवण येथे बंदर उभारणी करणे आवश्यक झाल्याचे वाघ यांनी सांगितले. बंदराची आखणी करणे व संकल्पना करून प्रत्यक्ष उभारणी करण्याची प्रक्रिया ही सुमारे १० वर्षांची असल्याने या दृष्टीकोनातून बंदर उभारणीसाठी जोरदार प्रयत्न सुरू असल्याचे ते म्हणाले. वाढवण येथील प्रस्तावित बंदराला पर्यावरण विभागाची मान्यता मिळाली असून सार्वजनिक गुंतवणूक मंडळाची मंजुरी अद्याप मिळालेली नाही. सध्या निवडणूक आचारसंहिता असल्याने मंत्रिमंडळाकडून परवानगी मिळू शकली नसल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

जेएनपीए येथे सध्या १५ मीटरची खोली प्राप्त असून त्या ठिकाणी १७ हजार कंटेनर क्षमता असणाऱ्या जहाजांची नांगरणी होणे शक्य होणार आहे. मात्र वाढवण येथे १८ ते २० मीटरची नैसर्गिक खोली प्राप्त असून २४ हजार कंटेनर क्षमतेपेक्षा अधिक जहाजांची बंदरात नांगरणी शक्य होणार असून त्यामुळे भारताची सिंगापूर, कोलंबो व इतर आंतरराष्ट्रीय बंदरांवरील अवलंबता संपुष्टात येईल, असे त्यांनी स्पष्ट केले.

### असली शिवसेनेचे असली उमेदवार

# निष्ठावंत शिवसैनिक राजन विचारेंची कोपरी-पाचपाखाडीत जोरदार रॅली



ठाणे (मेधा भोईटे) : महाविकास आघाडी शिवसेना (उध्दव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे उमेदवार राजन विचारे यांनी आज ठाण्यातील कोपरी पाचपाखाडी भागात जोरदार प्रचार केला. आपली निशाणी मशाल... शिवसेना जिंदाबाद... या घोषणेने कोपरी परिसर दुमदुमून गेला. जागोजागी निष्ठावंत शिवसैनिक राजन विचारे यांचे स्वागत करण्यात आले. असली शिवसेनेचे असली उमेदवार राजन विचारे यांना मतदारांनी तुफान प्रतिसाद दिला.

## स्व:पक्षातील कार्यकर्त्यांना हाडतुड करणे ही गद्दाराची खासियत : विचारे

गद्दार गटातील उमेदवाराने स्वतःची वेगळी ओळख निर्माण केली आहे. स्वपक्षातील कार्यकर्त्यांना हाडतुड करणे हीच त्याची खासियत असून शिवसैनिकांना त्रास दिला आहे. शिवसेना शाखेवर कब्जा करणे, विरोधकांची मुस्कटदाबी करणे, शिवसेना पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांवर गुन्हे दाखल करणे ही त्यांची गेल्या दोन वर्षांत ओळख केली असल्याची टीका राजन विचारे यांनी गद्दाराचे नाव न घेता केली.

शिवसेना (उध्दव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे लोकप्रीय उमेदवार राजन विचारे यांनी प्रचाराचा धडाका सुरू केला आहे. उमेदवारी जाहीर झाल्यापासून विचारे यांनी ठाणे, नवी मुंबई आणि मीरा भाईंदर येथे प्रचाराला सुरूवात केली आहे. विचारे यांनी इंडिया व महाविकास आघाडी पदाधिकाऱ्यांनी आज जोरदार स्वागत केले. ठाणे पूर्वेच्या नारायण कोळी चौक,अष्टविनायक चौक कोपरी,कोपरी गाव, नाखवा हायस्कूल,दौलत नगर धोबी घाट, आनंद नगर, गांधीनगर मेंटल हॉस्पिटल, वागळे नाका, डिसोजा वाडी,पंचपरमेश्वर मंदिर,रोड नं.१६, किसान नगर १, २, ३, भटवाडी, श्रीनगर, शांती नगर, आयटीआय नाका, रामनगर, टी एम टी डेपो, साठेनगर, जय भवानी नगर, इंदिरा नगर, लोकमान्य नगर डेपो, सावरकर नगर, महात्मा फुले नगर आई, माता मंदिर, अंबिका नगर, रामचंद्र नगर, वैती वाडी, लुईसवाडी, हजुरी, रघुनाथ नगर, काजूवाडी आदी ठिकाणी उमेदवार राजन विचारे यांनी मतदारांच्या गाठीभेटी घेतल्या.

त्यावेळी शिवसेनेचे जिल्हाप्रमुख केदार दिघे, उपजिल्हाप्रमुख कृष्णकुमार कोळी, संजय घाडीगावकर, शहरप्रमुख प्रदीप शिंदे, उपशहर प्रमुख प्रदीप शेडगे, माजी नगरसेवक मिलिंद बनकर, हिरालाल भोईर गिरीश राजे, विभाग प्रमुख दत्ता पगावले, लहू सावंत, स्वप्नील शिरकर. महिला जिल्हा संघटक रेखा खोपकर, महीला उप जिल्हा संघटक आकांक्षा राणे, महिला उपशहर संघटक मंजिरी ढमाले, ज्योती कोळी, स्नेहा पगारे, सक्रीय कार्यकारिणी सदस्य धनश्री विचारे, प्रवक्ता ॲड. पूजा भोसले, ॲड. आरती खळे, राष्ट्रवादी चे अध्यक्ष सुहास देसाई, आप चे अध्यक्ष सलुजा, कॉंग्रेसचे प्रदेश सरचिटणीस मनोज शिंदे, सरचिटणीस सचिन शिंदे, महेंद्र म्हात्रे, राहुल पिंगळे, राष्ट्रवादीचे युवक अध्यक्ष विक्रम खामकर, कॉंग्रेसच्या महिला अध्यक्ष वैती तसेच महाविकास आघाडीचे पदाधिकारी कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# पावसाळापूर्व कामे विहित वेळेत पूर्ण करण्याचे करा : आयुक्त डॉ. कैलास शिंदे

नवी मुंबई : नवी मुंबई शहरातील सर्व प्राधिकरणांमध्ये परस्पर समन्वय रहावा व पावसाळी कालावधीत कोणतीही अडचण उद्भवल्यास त्याचे तत्परतेने निराकरण व्हावे यादृष्टीने महापालिका आयुक्त तथा शहर आपत्ती व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष डॉ.कैलास शिंदे यांनी यापूर्वी सर्व प्राधिकरणांच्या संयुक्त बैठकीत सूचित केल्याप्रमाणे नवी मुंबई महानगरपालिकेमार्फत केल्या जाणाऱ्या पावसाळापूर्व कामांचा विभागनिहाय व सुविधानिहाय आढावा विशेष बैठकीत घेतला.



यामध्ये त्यांनी महापालिका क्षेत्रातील सुरु असलेल्या कामांची सद्यस्थिती शहर अभियंता तसेच आठही विभागांचे कार्यकारी अभियंता यांच्याकडून विभागवार जाणून घेतली. सुरु असलेली कामे १५ मे पर्यंत पूर्ण करण्याच्या सूचना यावेळी देण्यात आल्या. हवामान खात्याच्या अंदाजानुसार यावर्षी पावसाळा कालावधी लवकर सुरु होणार असून पावसाचे दिवस कमी असतील मात्र तीव्रता अधिक असेल हे लक्षात घेऊन त्यादृष्टीने तयारीत रहावे असे आयुक्तांनी सूचित केले.

बेलापूर ते दिघा अशा आठही विभागात सुरु असलेल्या रस्ते, चौक आदी कामांची सदयस्थिती जाणून घेतानाच होल्डिंग पाँड व त्यावरील फ्लॅप गेट बसविण्याची कामेही तातडीने पूर्ण करुन घ्यावीत असे आयुक्तांनी निर्देश दिले. गटारांची सफाई करताना काढला जाणारा गाळ हा दोन ते तीन दिवसांतच उचलण्याची कार्यवाही काटेकोरपणे केली जावी असेही आयुक्तांनी स्पष्ट निर्देश दिले. काही ठिकाणी बंद गटारांवरील झाकणे तुटली असल्यास ती तत्परतेने बदलावीत तसेच झाकणांच्या अधिकच्या चाव्या बनवून घ्याव्यात असेही सूचित करण्यात आले.

मोठे नाले सफाईची कामे सुरु झाली असून त्या कामांना वेग दयावा आणि ती लवकरात लवकर विहित वेळेत पूर्ण होतील याकडे कटाक्षाने लक्ष दयावे असे आयुक्तांमार्फत निर्देशित करण्यात आले. या नाल्यांच्या प्रवाह क्षेत्रात कोणताही अडथळा राहणार नाही याची विशेष दक्षता घेण्याचे सूचित करतानाच काही ठिकाणी नाल्यांच्या प्रवाह क्षेत्रात झोपडया असल्यास त्या हटविण्याची कार्यवाही करावी असेही निर्देश देण्यात आले. आठही विभागांचे सहा.आयुक्त तसेच स्वच्छता अधिकारी यांनी या बाबीकडे काळजीपूर्वक लक्ष दयावे असे आयुक्तांनी सूचित केले.

विभागवार सुरु असलेल्या पावसाळापूर्व कामांची सदयस्थिती काम निहाय लेखी स्वरुपात घेण्यात यावी तसेच १५ मे आणि ३० मे लाही त्या त्या वेळची स्थिती लेखी स्वरुपात आठही कार्यकारी अभियंत्यांकडून संकलित करावी व एकत्रित स्वरुपात सादर करावी असे निर्देश आयुक्तांनी शहर अभियंता यांना दिले.

पावसाळापूर्व नालेसफाई व गटारे सफाई या कामांना गती दयावी तसेच सुविधा कामांसाठी झालेले खोदकाम १५ मे पर्यंत पूर्ववत करुन घ्यावे असे सूचित करतानाच नमुंमपा आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांनी सर्व विभागांनी आपापली जबाबदारी सुयोग्य रितीने पार पाडावी व सुसज्ज राहावे असे निर्देश दिले. याप्रसंगी अतिरिक्त आयुक्त सुनिल पवार यांनी विविध विभागांनी करावयाच्या कामांचा बाबनिहाय आढावा घेतला. यावेळी अतिरिक्त आयुक्त शिरिष आरदवाड, शहर अभियंता संजय देसाई, आपत्ती व्यवस्थापन विभागाचे उपायुक्त चंद्रकांत तायडे व इतर विभागप्रमुख तसेच आठही विभागांचे सहा. आयुक्त तथा विभाग अधिकारी आणि कार्यकारी अभियंता उपस्थित होते.

'महाराष्ट्र सम्राट' हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक चंद्रकांत शंकरराव भोईटे यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अँड पब्लिकेशन्स प्रायव्हेट लिमिटेड, प्लॉट नंबर – डब्लू २३० टी.टी.सी. इंडस्ट्रियल एरिया, कोपर खैरणे, एम.आय.डी.सी., ठाणे बेलापूर रोड, नवी मुंबई – ४००७१० येथे छापून ३०२, हार्मोनी टॉवर, भारत ज्वेलर्स समोर, नेताजी सुभाष चंद्र रोड, कोर्ट नाका, ठाणे पश्चिम – ४००६०१ (महाराष्ट्र ) येथे प्रकाशित केले. संपादक – चंद्रकांत शंकरराव भोईटे ■ RNI - MAHMAR/2012/44140 ■ मो. नं. : +९१-९१६७९५७७७१